World Wide Journal of Multidisciplinary Research and Development




WWJMRD 2018;4(12):107-108
www.wwjmrd.com
*International Journal*
*Peer Reviewed Journal*
*Refereed Journal*
*Indexed Journal*
*Impact Factor MJIF: 4.25*
E-ISSN: 2454-6615

**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

# ''ख्रिस्ती साहित्याचा मूलाधार पवित्रशास्त्र''

## विश्वास गोरखनाथ वळवी

**Abstract**
"The composition and purpose of the scriptures give us the basis of Christian literature. Paul's letter to Timothy is written in 2nd chapter 3 and verses 15 to 17 *." You know, you know the scriptures since childhood. This is the power to lead to salvation. Since every scripture is inspired by God, it is useful for teaching, correcting evil, correcting mistakes and leading a righteous life. A clear answer is given by reading the above verses. Christian literature should be based on Scripture and its revelation.
By faith in Jesus Christ: - The scriptures are given to us in Jesus Christ. I cannot understand the scriptures and their revelation through Christ. So I have to test faith again and again. Christianity cannot develop in life.
Conclusion: - A Christian should be ready for every good deed: - The main purpose of giving scriptures is that the Christian should be worthy. The scripture is perfect. Its words have innumerable powers.

**Keywords:** Scripture, Scriptures, Christians, God, Christian, Salvation, Revelation, Jesus Christ, Holy Spirit, Verses

**प्रस्तावना:**

"पवित्रशास्त्राची निर्मिती आणि उद्देश आपल्यांना ख्रिस्ती साहित्याच्या आधार देते.पौलाचे तीमथीकरास दुसरे पत्र तिसरा अध्याय आणि पंधरा ते सतरा वचनात लिहिलेले आहे *."तुला माहीत आहे की,तू आपल्या बाल्यावस्थेत असल्यापासूनच तुला पवित्र शास्त्राची माहिती आहे.ते ख्रिस्त येशूमधील विश्वासाच्याद्वारे तुला शहाणे बनवण्याचे व तारणाकडे घेऊन जाण्याचे सामर्थ्य आहे.प्रत्येक शास्त्रलेख देवाच्या प्रेरणेने लिहिला असल्यामुळे तो शिकवण्यास,वाईटाचा निषेध करण्यास,चुका सुधारण्यास व योग्य जीवन जगण्याचे मार्गदर्शन करण्यास उपयुक्त आहे.यासाठी की,देवाचा मनुष्य तरबेज होऊन पूर्णपणे प्रत्येक चागंल्या कामासाठी सज्ज व्हावा."* आता पवित्रशास्त्र आपल्यांना का दिलेला आहे? याचे स्पष्ट उत्तर वरील वचने वाचून आपल्यांना कळते.ख्रिस्ती साहित्य पवित्रशास्त्र आणि त्याच्या प्रकटीकरणांवर आधारित असले पाहिजे.

तुझ्या बाल्यावस्थेपासून तुला पवित्रशास्त्र आणि त्याच्या वचनांची ओळख आहे:-आज भरपूर ख्रिस्ती लोक पिढ्यानपिढ्या ख्रिस्ती धर्मात आपले जीवन-यावण करीत आहे.त्यामुळे त्यांच्या मुळा-बाळांना पवित्रशास्त्राची ओळख झालेली असतेच.ख्रिस्ती लोकांना प्रथम प्रकटीकरण आणि ज्ञान हे पवित्रशास्त्रातुन मिळत असते.त्यामुळे त्यांनी कोणते साहित्य वाचावे हे त्यांना कळते.आणि ख्रिस्ती साहित्यनिर्मितीचा आधार पवित्रशास्त्रा शिवाय असूच शकत नाही.हे त्यांना वेगळे समजून देण्याची गरज नाही.त्यामुळे ख्रिस्ती लोकांनी लिहिलेल्या साहित्यातून आपल्याना देवाच्या राज्याचे सत्य-प्रकटीकरण प्राप्त होत असते.

ख्रिस्त येशूमधील विश्वासाद्वारे:-पवित्रशास्त्र हे आम्हाला ख्रिस्त येशूमध्ये दिलेले आहे.मी ख्रिस्ताला बाजू सारून पवित्रशास्त्र आणि त्याचे सत्य-प्रकटीकरण समजू शकत नाही.त्यामुळे मला वारंवार विश्वासाची परीक्षा द्यावी लागणार.विश्वासाचा कसोटीवर मला पवित्रशास्त्राचे वाचन,मनन आणि चिंतन करणे गरजेचे आहे.त्याशिवाय मी ख्रिस्ती जीवनात वाढू शकत नाही.

शहाणे बनविण्यास आणि तारणाचा मार्गावर चालण्यास मदत करते:- जेवढा वेळ मी पवित्रशास्त्र वाचनात देईन, तेवढ्याच जास्त प्रमाणात आणि प्रतिदिनी मी प्रभुचा सामर्थ्यात वाढत जाईन.आणि तारणाचा मार्ग माझ्यासाठी सोपा होत जाईल.देवाचे वचन मला शहाणे बनविण्यात अग्रेसर आहे.त्यामुळे

**Correspondence:**
**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

जगिक ज्ञानाचा प्रभाव माझ्यावर कोणत्याही परिस्थितीत होणार नाही.आणि स्वर्गीय आशीर्वादाने मी दिवसेंदिवस वाढत जाईन.प्रत्येक शास्त्रलेख देवाच्या प्रेरणेने लिहिलेला आहे:-देवाचे लोक नेहेमी पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाने चालत असतात.त्यामुळे पवित्रशास्त्र आणि त्यातील प्रत्येक शब्द हा देवाकडून आहे.मनुष्य हे फक्त देवाच्या प्रेरनेला शब्दबद्ध करणारे माध्यम होते.देवाने त्यांच्या बुद्धीच्या,कौशल्याच्या आणि ज्ञानाचा वापर करून घेतला.त्यामुळे ख्रिस्ती साहित्य त्यालाच म्हणता येईल जे पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनातून लिहिले गेलेले आहे.आणि ते तेव्हाच शक्य आहे.जेव्हा ते साहित्य एक ख्रिस्ती व्यक्ती लिहीत आहे.

पवित्रशास्त्र ख्रिस्ती लोकांना शिकविण्यास सज्ज आहे:- पवित्रशास्त्र आणि त्याच्या प्रत्येक शब्द हा ज्ञान प्रवाहित करीत असतो.जगात अनेक महान शिक्षक झाले.अनेक साहित्याची निर्मिती करण्यात आली.पण पवित्रशास्त्र आणि त्यातील सत्य-प्रकटीकरणाशिवाय दुसरे कोणतेही साहित्य अथवा शिक्षण ख्रिस्ती लोकांसाठी दुय्यम आहे.

पवित्रशास्त्र वाईटाचा निषेध करण्यास सज्ज आहे:-सत्य काय आहे? तर पवित्रशास्त्राचे वचन.ख्रिस्त येशु म्हणतात "देवाचे वचन सत्य आहे आणि ते तुम्हाला स्वतंत्र करते." देवाचे वचन आपल्यांना शुद्ध करते.अंतिम सत्य देवाचे वचन आहे."आकाश आणि पृथ्वी नाहीशी होतील पण देवाचे वचन चिरकाल टिकणार."म्हणून असत्याच्या विरोध फक्त पवित्रशास्त्र करू शकते कारण ते अंतिम सत्य आहे.एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून माझा सत्याच्या आधार पवित्रशास्त्र आहे.आणि त्याच्या शब्दनिशब्दांनी मी माझ्या जीवनात रोज वाईटाचा निषेध करीत असतो.

पवित्रशास्त्र ख्रिस्ती लोकांच्या चुका सुधारण्यास सज्ज आहे:-भलेही एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून आमची पापे शुद्ध झालेली आहे.आम्हाला पापाची क्षमा मिळाली आहे.पण तरी शास्त्र म्हणते ते मनुष्याच्या चुका सुधारण्यास दिलेले देवाचे वचन आहे.याचा अर्थ मनुष्य लहान-मोठ्या गोष्टीत चुकत असतो.त्यासाठी एकच उपाय आहे? त्या चुका सुधारण्यासाठी एकच उपाय आहे ते म्हणजे पवित्रशास्त्र.

जीवन जगण्याचे सर्वोत्तम मार्गदर्शन पवित्रशास्त्र आहे:-पवित्र आणि शुद्ध जीवन जगण्याचे सर्वोत्तम ज्ञान कुठे असेल.? ?तर सहाजिकच उत्तर आहे.पवित्रशास्त्र.आज युरोपात ख्रिस्ती लोकांच्या जीवनशैलीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जातात.मी म्हणतो तीच परिस्थिती भारतातील ख्रिस्ती लोकांसाठी देखील म्हणता येईल.त्यामुळे खरे ख्रिस्ती जीवन तोच व्यक्ती जगू शकतो ज्याचे जीवन पवित्रशास्त्राधारीत आहे.

निष्कर्ष:-प्रत्येक चांगल्या कामासाठी ख्रिस्ती व्यक्ती सज्ज असला पाहिजे:- पवित्रशास्त्र देण्याच्या मुख्य उद्देश ख्रिस्ती व्यक्तीने आपली योग्यता धारण करावी हा आहे.पवित्रशास्त्र परिपूर्ण आहे.त्याच्या शब्दनिशब्दात अगणित सामर्थ्य आहे.त्यामुळेच ख्रिस्ती साहित्याच्या मूलाधार पवित्रशास्त्र आहे.

**संदर्भसूची: -**

1. पौलाचे तीमथीकरास दुसरे पत्र ३ अध्याय वचन १५-१७, पवित्रशास्त्र